प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ग्रामीण गट गृहनिर्माण (Group Housing) राबविण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रात वाढ करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## गृहनिर्माण विभाग

**शासन निर्णय क्रमांक : प्रआयो २०१९/प्र.क्र.९७/गृनिधो-२**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
३ रा मजला, मंत्रालय, मुंबई .०३२ ४००
दिनांक :- १९ सप्टेंबर, २०१९

<u>वाचा</u>:-

१) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्रमांक, प्रआयो २०१९/प्र.क्र.११०/गृनिधो-२, दि.०९.१२.२०१५.

२) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्रमांक, महाहौसिंग २०१७/प्र.क्र.१६१/गृनिधो-२, दि.११.१२.२०१८.

<u>प्रस्तावना</u> :-

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत “सर्वांसाठी घरे -२०२२” बाबत केंद्र शासनाने सन-२०१५ मध्ये धोरण जाहीर केलेले आहे. सदर धोरणाची राज्यात अंमलबजावणी करण्याकरीता राज्य मंत्रिमंडळाने दिनांक १ डिसेंबर, २०१५ च्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यांत आलेला आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत शहरी भागातील परवडणाऱ्या घरांच्या मोठया प्रकल्पांची उभारणी करण्याकरिता तसेच आर्थिकदृष्टया दुर्बल घटक, अल्प उत्पन्न गट आणि मध्यम उत्पन्न गटातील लाभार्थ्यांकरीता सन २०२२ पर्यंत किमान ५ लाख परवडणाऱ्या घराची निर्मिती करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ (Maha Housing) ची स्थापना दि.११.१२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत सदर महामंडळाचे कार्यक्षेत्र नागरी भागापुरते मर्यादित आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळामार्फत ग्रामविकास विभागाच्या सहकार्याने प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ग्रामीण भागात Group Housing राबविण्याच्या उद्देशाने सदर महामंडळाचे कार्यक्षेत्र शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातही विस्तारीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय</u>-:**

प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत मोठया वसाहतींचे प्रकल्प राबविण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळाचे (Maha Housing) कार्यक्षेत्र शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातही विस्तारीत करण्यास यान्वये मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळाने प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ग्रामविकास विभागाच्या मान्यतेस अनुसरुन ग्रामीण भागात Group Housing योजना राबविण्यास देखील मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०९१९११३२३६५७०९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( दुर्गाप्रसाद मैलावरम )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई .
२) मा. मंत्री (गृहनिर्माण), मंत्रालय, मुंबई.
३) सह अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ ,साखर भवन, नरीमन पॉईट, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण), मंत्रालय, मुंबई
५) अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
६) प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
८) सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी
९) सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.